**तक्रार (यु.एल.पी.) क्र. ०९/२०११**
**निशाणी सी–३७**
**पान क्र.९, परिच्छेद क्र.१२.**

**<u>शपथेवर उलटतपास –तक्रारदारतर्फे विधीज्ञ श्री. एस.आर.राणे.</u>**

१२. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणात पुरावा देण्यासाठी कारखान्याने मला लेखी अधिकारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाबदार कारखान्यातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष एवढे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदार कारखान्यामध्ये परचेस मॅनेजर म्हणून कार्यरत होतो व सध्या इनचार्ज सेक्रेटरी म्हणून सेवेत आहे हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, सदर पुरावा कारखान्यात उपलब्ध आहे व आवश्यकता पडल्यास मी दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परीच्छेद क्र.१ मधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणात कारखान्याच्या वतीने कोण–कोणती कागदपत्रे दाखल आहेत याविषयी मला माहिती नाही. सदर प्रकरणात कारखान्याच्या वतीने चौकशीची कागदपत्रे दाखल केली आहेत व ती फोटो कॉपीमध्ये आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी चौकशीची अस्सल मुळ कागदपत्रे

पाहिलेली नाहीत. ती कागदपत्रे मी कारखाना दप्तरी असताना पाहिली आहेत.

१३. हे म्हणणे खरे आहे की, चौकशीच्या कागदपत्राव्यतीरीक्त मला तक्रारदार याच्या प्रकरणाविषयी वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी श्री.एस.आर.चव्हाण, श्री. देगन्नावर, श्री.पांडुरंग तुकाराम घाडगे, श्री. गुरुराज, श्री. निवास गोटे, श्री. संपत राजाराम माने यांचेसोबत केंव्हाही काम केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, उपरनमूद सर्व कर्मचाऱ्यांचे सेवा कालावधी संदर्भाचा अभिलेख कारखान्यात उपलब्ध आहे. सदर प्रकरणात न्यायालयाने चौकशी संदर्भात काय आदेश पारीत केला आहे, याविषयी मला माहिती नाही. न्यायालयाने चौकशी अधिकारी यांचे निष्कर्षाबाबत काय आदेश पारीत केला आहे, याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणातील कारखान्याच्या वतीने दाखल करण्यात आलेली कैफियत वाचलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील परीच्छेद क्र.९ मधील मजकूर कारखान्याच्या वतीने दाखल कैफियतीमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रारदार विश्वास कोळी यांना प्रत्यक्षात केंव्हाही भेटलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांना कारखान्यातून कमी केल्यापासून ते बेकार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या

पुराव्याच्या शपथपत्राच्या परीच्छेद क्र.९ मधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांनी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांना बेकायदेशीर, खोटे व चुकीचे दोषारोपपत्र देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्र कारखान्याच्या वकील साहेबांनी तयार केले व मी स्वतः वाचून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**

**सांगली.**
**दि. १२/०३/२०२४**

**(सैफुद्दीन बा.शेख)**
**न्यायाधीश,**
**कामगार न्यायालय, सांगली.**